# भगवान महावीर अध्यासनास लठ्ठे फाउंडेशनतर्फे संशोधन शिष्यवृत्ती

कोल्हापूर, ता. ८ : शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनातर्फे प्रथमाचार्य शांतिसागर महाराज यांच्या मुनीदिशा शताब्दीनिमित्त आयोजित राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन आमदार प्रकाश आवाडे यांच्या हस्ते झाले. या वेळी त्यांनी लठ्ठे फाउंडेशनचे उद्‌घाटन केले. दरम्यान, शाहू महाराजांचा समतेचा विचार व समाजप्रबोधन आचार्य शांतिसागर महाराजांनी ३० हजार किलोमीटरच्या पायी प्रवासातून प्रस्थापित केले. यानिमित्त लठ्ठे फाउंडेशनने महावीर अध्यासनास संशोधन शिष्यवृत्ती, तसेच एक लाख रुपयांची देणगी जाहीर केली.

आमदार आवाडे यांनी लठ्ठे यांच्या जीवनावर अभ्यास शिष्यवृत्ती, पी. एच. डी संपादन करणाऱ्या पहिल्या दोन अभ्यासकांना प्रत्येकी ५१ हजारांचे बक्षीस जाहीर केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी प्रा. डी. ए. पाटील लिखित 'शांतिसागर महाराज जीवन चरित्र' या पुस्तकाचे तसेच भारती उपाध्ये लिखित 'आत्मसंस्कार' या पुस्तकांचे प्रकाशन केले. सुरवात प्रा. संदीप पाटील यांच्या मंगलाचरणाने झाली. डॉ. व्ही. बी. काकडे यांनी प्रास्ताविक केले. आभार सुरेश रोटे यांनी मानले. एस. डी. पाटील यांनी सूत्रसंचालन केले. संयोजक ... जैन, हेमंत लठ्ठे, संजय शेटे, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. बी. डी. खणे, डॉ. पद्मजा पाटील, प्रा. डॉ. डी. ए. पाटील, विमल पाटील, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, डॉ. रावसाहेब पाटील आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : पुस्तकांचे प्रकाशन करताना आमदार प्रकाश आवाडे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. डॉ. जे. एफ. पाटील, पद्मजा पाटील आदी.

## राष्ट्रीय चर्चासत्रात आज...

● सकाळी ९ ते ११ : (कै.) दिवाणबहादूर आण्णासाहेब लठ्ठे जीवनचरित्र व्याख्यान : व्याख्याते प्रा. डी. ए. पाटील ● सकाळी ११ ते दुपारी १२.३० : श्री. शांतिसागरजी महाराज- तपसाधना : व्याख्याते डॉ. महावीर अक्कोळे ● दुपारी १२.३० ते १ : श्री. शांतिसागर- सल्लेखना महामहोत्सव : व्याख्याते डॉ. पुरंदर चौगुले ● दुपारी ३ ते ४.३० : श्री. शांतिसागर महाराज पदविहार एक सामाजिक, आध्यात्मिक परिवर्तन : व्याख्यात्या- डॉ. पद्मजा पाटील

# व्यवस्थापन, तंत्रशिक्षण प्रवेश प्रक्रियेस आरंभ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** करोना, आरक्षण अशा विविध कारणांनी रखडलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया आता सुरू झाल्या आहेत. व्यवस्थापन पदव्युत्तर (एमबीए), वास्तुकला अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्या आहेत, तर अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया बुधवारपासून (९ डिसेंबर) सुरू होत आहेत.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या रखडलेल्या प्रवेश प्रक्रिया आता सुरू होत आहेत. यंदा करोनाच्या प्रादुर्भावामुळे प्रवेश परीक्षांना उशीर झाला. व्यवस्थापन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश परीक्षेचा निकाल मे महिन्यात जाहीर झाला होता. निकाल जाहीर होऊन सहा महिने, तर वास्तुकला पदवी अभ्यासक्रमाच्या राष्ट्रीय प्रवेश प्रक्रियेचा निकालही साधारण तीन महिन्यांपूर्वी जाहीर होऊनही प्रवेश प्रक्रिया रखडली होती. मात्र, अखेर राज्याच्या प्रवेश नियमन कक्षाने या प्रवेश प्रक्रिया सुरू केल्या आहेत. यंदा राज्यात व्यवस्थापन पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ३६ हजार जागा उपलब्ध आहेत. त्यासाठी १ लाख



१० हजार ६०० विद्यार्थी पात्र ठरले आहेत. वास्तुकला पदवी अभ्यासक्रमासाठीही विद्यार्थी नोंदणी सुरू करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांची संख्या अधिक असलेल्या अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया बुधवारपासून सुरू होत आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी यंदा साधारण ३ लाख ८६ हजार विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

**वेळापत्रकाचे पालन नाही**

देशातील महाविद्यालये सुरू करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळापत्रक दिले होते. त्यानुसार प्रथम वर्षाचे वर्ग नोव्हेंबरपासून सुरू होणे अपेक्षित होते. तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांचे नियमन करणाऱ्या अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने १ डिसेंबरची मुदत दिली होती. ही मुदतही ३१ डिसेंबरपर्यंत वाढवण्यात आली. मात्र, आता जानेवारीपासूनही राज्यातील तंत्रशिक्षण महाविद्यालयातील प्रथम वर्षाचे वर्ग सुरू होणार नसल्याचे दिसत आहे. बहुतेक सर्वच तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया १५ जानेवारीपर्यंत आहेत.

## एमबीए आणि वास्तुकला प्रवेश प्रक्रिया

■ ८ ते १३ डिसेंबर - ऑनलाइन नोंदणी

■ ८ ते १४ डिसेंबर (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) - कागदपत्र पडताळणी

■ १६ डिसेंबर - तात्पुरती गुणवत्ता यादी ■ १७ आणि १८ डिसेंबर - हरकती नोंदवणे ■ २० डिसेंबर - अंतिम गुणवत्ता यादी ■ २१ ते २३ डिसेंबर - पहिल्या फेरीसाठी अर्ज भरणे ■ २६ डिसेंबर - पहिली प्रवेश यादी ■ २७ ते २९ डिसेंबर - मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे ■ ३० डिसेंबर - दुसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांचे तपशील जाहीर करणे

## अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रिया

■ ९ ते १५ डिसेंबर - ऑनलाइन नोंदणी ■ ९ ते १६ डिसेंबर (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) - कागदपत्र पडताळणी ■ १८ डिसेंबर - तात्पुरती गुणवत्ता यादी ■ १९ आणि २० डिसेंबर (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) - हरकती नोंदवणे ■ २२ डिसेंबर - अंतिम गुणवत्ता यादी ■ २३ ते २५ डिसेंबर - पहिल्या प्रवेश फेरीसाठी अर्ज करणे ■ २८ डिसेंबर - पहिली प्रवेश यादी ■ २९ ते ३१ डिसेंबर - मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे ■ १ जानेवारी २०२१ - दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांचे तपशील

## औषधनिर्माणशास्त्र प्रवेश प्रक्रिया

■ ९ ते १४ डिसेंबर - ऑनलाइन नोंदणी ■ ९ ते १५ डिसेंबर (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) - कागदपत्र पडताळणी ■ १७ डिसेंबर - तात्पुरती गुणवत्ता यादी

■ १८ आणि १९ डिसेंबर (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) - हरकती नोंदवणे

■ २१ डिसेंबर - अंतिम गुणवत्ता यादी ■ २२ ते २४ डिसेंबर - पहिल्या प्रवेश फेरीसाठी अर्ज करणे ■ २७ डिसेंबर - पहिली प्रवेश यादी ■ २८ ते ३० डिसेंबर - मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे

■ ३१ डिसेंबर - दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी रिक्त जागांचे तपशील

# विद्यापीठाच्या विषम सत्राच्या परीक्षा १५ डिसेंबरपासून सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने उन्हाळी सत्रातील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विषम सत्राच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा १५ डिसेंबरपासून सुरू होणार आहेत. त्या अनुषंगाने परीक्षा विभागाकडून तयारी सुरू झाली आहे. विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने विषम सत्राच्या परीक्षा महाविद्यालय, अधिविभाग स्तरावर घेण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार सर्व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या (अभियांत्रिकी, फार्मसी, विधी अभ्यासक्रम वगळून) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा १५ ते ३१ डिसेंबर या कालावधीत होणार आहेत. परीक्षेचे वेळापत्रक महाविद्यालय, अधिविभागस्तरावर तयार होणार आहे.

एमबीए, बीबीए, बीसीए अभ्यासक्रमाच्या परीक्षा अग्रणी महाविद्यालयाच्या वतीने १५ डिसेंबरपासून घेतल्या जाणार आहेत. कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च, सातारा हे अग्रणी महाविद्यालय समन्वयक म्हणून भूमिका पार पाडणार आहे. अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या परीक्षा २७ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर दरम्यान झाल्या. याकाळात 'सीईटी' परीक्षा, कोरोना प्रादुर्भाव, गैरहजर व इतर तांत्रिक कारणांमुळे काही विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही. अशा विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने १७ डिसेंबरपासून घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी नोंदणी ९ डिसेंबरपर्यंत करणे गरजेचे आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळास भेट द्यावी, असे आवाहन जी. आर. पळसे यांनी केले आहे.

# लोकविकास केंद्रातर्फे पंचकर्म अभ्यासक्रम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या लोकविकास केंद्रातर्फे या शैक्षणिक वर्षापासून लोकविकास केंद्राने 'पंचकर्म सहाय्यक' हा अभ्यासक्रम सुरू केला आहे. वनौषधी विद्यापीठ संस्थेच्या आयुर्वेद पंचकर्म सेंटर, लक्ष्मीपुरी येथे सहा महिन्यांचा हा अभ्यासक्रम शिकविला जाणार आहे. त्याची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. या अभ्यासक्रमात किमान कौशल्य शिकविली जाणार आहेत.

# संत जगनाडे महाराजांना अभिवादन

कोल्हापूर : प्रतिनिधी

संत संतुजी जगनाडे महाराज यांना मंगळवारी जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये सकाळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अंतर्गत लेखापाल अजित चौगुले यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# संत जगनाडे महाराज यांना अभिवादन

**कोल्हापूर :** संत संतुजी जगनाडे महाराज यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात मंगळवारी अभिवादन केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला.

# संत जगनाडे महाराजांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : संत संतुजी जगनाडे महाराज यांना आज जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये मंगळवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते संत जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अंतर्गत लेखापाल अजित चौगुले यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# एनसीसी अॅडहॉक बोर्डावर डॉ. रूपा शहा



डॉ. रूपा शहा

**आर. के. नगर :** शिवाजी विद्यापीठ कायद्यानुसार 'एनसीसी' अॅडहॉक बोर्डाची स्थापना झाल्यापासून 'एनसीसी'च्या ऑनररी मेजर प्रा. डॉ. रूपा शहा या अॅडहॉक बोर्डात सदस्या व अध्यक्षा म्हणून सातत्याने कार्यरत होत्या. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या मान्यतेने नव्याने गठीत झालेल्या अॅडहॉक बोर्डमध्येही सदस्या म्हणून त्यांची निवड झाली. प्रा. डॉ. शहा सेवानिवृत्त असल्या तरी त्यांच्या एनसीसीसाठीच्या प्रदीर्घ काळातील गुणवत्तापूर्ण सेवेची दखल घेत राष्ट्रपतींनी त्यांना ऑनररी मेजर पदाचा सन्मान प्रदान केला आहे. त्यामुळे त्यांची पुन्हा निवड झाली आहे.

# शांतीसागर महाराज हेच शाहूंच्या समतेच्या विचाराचे वारसदार

■ लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शाहू महाराजांनी घालून दिलेल्या समतेच्या विचाराच्या अंमलबजावणीसाठी केलेल्या कार्यामुळे प्रथमाचार्य शांतीसागर महाराज हेच खऱ्या अर्थाने शाहूंचे वारसदार ठरतात, असे कौतुकोद्गार आमदार प्रकाश आवाडे यांनी मंगळवारी काढले. महावीर अध्यासन केंद्र जैन संस्कृती, साहित्य, विज्ञानाचे बौद्धिक आंतरक्रियेसाठी जागतिक पातळीवरचे केंद्र बनेल, असा आशावादही व्यक्त केला.

दिगंबर जैन बोर्डिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या महावीर अध्यासन केंद्रातर्फे आयोजित मानवतेचे दीपस्तंभ शांतीसागर महाराज या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. शांतीसागर महाराजांच्या मुनिदीक्षा शताब्दीनिमित्त हे



प्रथमाचार्य शांतीसागर महाराज यांच्यावर महावीर अध्यासन केंद्रातर्फे मंगळवारी दिगंबर जैन बोर्डिंगमध्ये राष्ट्रीय चर्चासत्र झाले. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आमदार प्रकाश आवाडे, चेंबर्स ऑफ कॉमर्सचे संजय शेटे, हेमंत लठ्ठे, जे. एफ. पाटील, विजय ककडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

चर्चासत्र भरवले असून, याला महाराष्ट्र, कर्नाटकातून प्रतिनिधींनी सहभाग दर्शवला. यावेळी प्रा. डी. ए. पाटील लिखीत शांतीसागर महाराज जीवनचरित्र, भारती उपाध्ये लिखित आत्मसंस्कार या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

आवाडे म्हणाले, शांतीसागर महाराजांनी शाहू महाराजांच्या समतेचा विचार समाजात रुजविण्यासाठी ३० हजार किलोमीटरच्या पायी प्रवास केला. त्यांनी कायमच प्रगतशील विचारांना उचलून धरले. समाजाच्या उन्नतीसाठी होणाऱ्या उपक्रमांना त्यांनी सढळ हस्ते मदतीचे आवाहन केले. शांतीसागर महाराजांचे कार्य कायमच अनुकरणीय राहिले. त्यांचा हा जीवनपट समाजासमोर येण्यासाठी केलेले हा राष्ट्रीय चर्चासत्राचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचेही आवाडे यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के यांनी या चर्चासत्रात अभ्यास व संशोधनावर झालेली चर्चा उत्साह वाढवणारी असून महावीर अध्यासन केंद्र संशोधनात मोठी भरारी घेईल, असा विश्वास व्यक्त केला.

या चर्चासत्रात सुरेंद्र जैन, हेमंत लठ्ठे, संजय शेटे, सुरेश रोटे, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. बी. डी. खणे, डॉ. पद्मजा पाटील, विमल पाटील, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, डॉ. रावसाहेब पाटील सहभागी झाले. प्रास्ताविक महावीर अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. विजय ककडे यांनी केले. आभार सुरेश रोटे यांनी मानले.

## फौंडेशनचे उद्घाटन

आमदार प्रकाश आवाडे यांच्या हस्ते लठ्ठे फौंडेशनचे उद्घाटन झाले. आवाडे यांनी लठ्ठे यांच्या जीवनावर पीएच.डी. करण्यासाठी अभ्यास शिष्यवृत्ती म्हणून पहिल्या दोन अभ्यासकांना प्रत्येकी ५१ हजार रुपये बक्षीस देण्याची घोषणा केली. याशिवाय लठ्ठे फौंडेशनतर्फे महावीर अध्यासन केंद्राला संशोधन शिष्यवृत्तीसाठी एक लाखाची देणगीही देण्यात आली.

## आज समारोप

शांतीसागर महाराज यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकण्यासाठी घेतलेल्या दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचा समारोप आज, बुधवारी खासदार संभाजीराजे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.